# महाराष्ट्र विधानसभा

## चौथे अधिवेशन, २०१७

---

## अतारांकित प्रश्नोत्तरांची यादी

**प्रश्नांची एकूण संख्या - ५०**

---

### नवी मुंबई खाडी किनाऱ्यावरील मासेमारी धोक्यात आली असल्याबाबत

**(१) ४०४६७ (२०-०४-२०१६). श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व) :** सन्माननीय **पर्यावरण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नवी मुंबई खाडी किनाऱ्यावर मासेमारी करणाऱ्या आगरी व कोळी लोकांची मासेमारी खाडीतील प्रदूषणामुळे व वन खात्याच्या आडकाठीमुळे धोक्यात आली असल्याचे माहे डिसेंबर २०१५ मध्ये निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, खाडीचे वाढत्या प्रदूषणाचे नेमके काय कारणे आहेत,

(३) असल्यास, स्थानिक मासेमारी यांच्यावर बेकारी संकट येऊ नये व त्यांना शासनाकडून त्रास होऊ नये म्हणून कोणत्या उपाययोजना करण्यात येणार आहे,

(४) तसेच, खाडीचे प्रदूषणास कारणीभूत असणाऱ्या कंपन्या, संस्थांवर निर्बंध घालण्यात येणार आहे काय,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. रामदास कदम (०९-०८-२०१७) :**(१) हे खरे नाही.

(२), (३) व (४) नवी मुंबई परिसरातील औद्योगिकरण व नागरीकरण या क्षेत्रातून निर्माण होणाऱ्या सांडपाण्यावर योग्य त्या प्रमाणात प्रक्रिया केली जाते. नवी मुंबई परिसरात प्रामुख्याने खाडी किनारा लाभलेला असून खाडीच्या पाण्याची गुणवत्ता खाल्यावल्याचे दिसून येत नाही.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राजकीय विद्यार्थी संघटनेमार्फत रत्नागिरी, जिल्हाधिकारी कार्यालयावर काढण्यात आलेल्या मोर्चाबाबत**

**(२) ४२८०२ (१५-०५-२०१६). श्री.किसन कथोरे (मुरबाड), श्री.संजय केळकर (ठाणे), श्री.सुरेश लाड (कर्जत), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.मकरंद जाधव-पाटील (वाई), श्री.वैभव पिचड (अकोले), श्री.शामराव ऊर्फ बाळासाहेब पाटील (कराड उत्तर), श्री.शशिकांत शिंदे (कोरेगाव), श्री.हसन मुश्रीफ (कागल), श्री.दत्तात्रय भरणे (इंदापूर), श्री.नरहरी झिरवाळ (दिंडोरी), डॉ.सतीश (अण्णासाहेब) पाटील (एरंडोल), श्री.भास्कर जाधव (गुहागर), श्री.संदीप नाईक (ऐरोली), श्री.राणाजगजीतसिंह पाटील (उस्मानाबाद) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील विद्यार्थ्यांच्या विविध समस्या, प्रश्न इ. प्रलंबित मागण्यांवर तात्काळ निर्णय घेण्याबाबत एका राजकीय विद्यार्थी संघटनेमार्फत माहे जानेवारी, २०१६ च्या पहिल्या सप्ताहात रत्नागिरी, जिल्हाधिकारी कार्यालयावर मोर्चाचे आयोजन करण्यात आले होते, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर संघटनेच्या समस्या प्रश्न व प्रलंबित मागण्या कोणकोणत्या आहेत,

(३) असल्यास, सदर संघटनेच्या समस्या प्रश्न व प्रलंबित मागण्या सोडविण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे (०५-०८-२०१७) :** (१) हे खरे नाही.

(२), (३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**कोल्हापूर जिल्ह्यातील वेतनेत्तर अनुदानास पात्र ठरलेल्या माध्यमिक शाळांना अनुदान मिळण्याबाबत**

**(३) ४६२९८ (१२-०५-२०१६). श्री.उल्हास पाटील (शिरोळ) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कोल्हापूर जिल्ह्यातील ६७९ अनुदानित माध्यमिक शाळांपैकी २४८ शाळा वेतनेत्तर अनुदानास पात्र ठरल्या परंतु वेतनेत्तर अनुदान मिळाले नसल्याने या शाळांना मूलभूत सुविधा पुरविण्यात अडचणी आल्या आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या शाळांना वेतनेत्तर अनुदान न देण्याची कारणे काय आहेत,

(३) असल्यास, या शाळांना वेतनेत्तर अनुदान देण्याबाबत कोणती कार्यवाही करण्यात आली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे (२५-०९-२०१७)** :(१) नाही. ६७९ पैकी ४३१ पात्र शाळांना वेतनेत्तर अनुदान वितरीत करण्यात आलेले आहे.

(२) व (३) पात्रतेचे निकष पूर्ण न करणा-या शाळांना वेतनेत्तर अनुदान अनुज्ञेय नाही.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**चाळीसगावसह भडगाव व पाचोरा (जि.जळगाव) तालुक्यातील जिल्हा परिषद शाळामध्ये गत चार वर्षात तब्बल २४०९ विद्यार्थांची गळती झाल्याबाबत**

**(४) ४९५२८ (२५-०५-२०१६). श्री.किशोर पाटील (पाचोरा) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) चाळीसगावसह भडगाव व पाचोरा तालुक्यातील (जि.जळगांव) जिल्हा परिषद शाळांमध्ये गत चार वर्षात तब्बल २४०९ विद्यार्थांची गळती झाल्याचे माहे फेब्रुवारी, २०१६ च्या सुमारास निदर्शनास आले हे खरे आहे काय,

(२) तसेच काही जिल्हा परिषदेच्या शाळा बंद पडण्याच्या मार्गावर आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या विद्यार्थी गळतीचे कारणे काय आहेत,

(४) असल्यास, याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे (२५-०९-२०१७)** :(१), (२) व (३) नाही.

(४) जळगाव जिल्ह्यात चाळीसगाव, भडगाव व पाचोरा तालुक्यात दि. ४ जुलै, २०१५ रोजी एक दिवसीय सर्वेक्षण विभागामार्फत करण्यात आले होते. या सर्वेक्षणामध्ये तीनही तालुक्यांत मिळून ३८८ शाळाबाह्य विद्यार्थी सापडले होते. त्यापैकी ३१८ विद्यार्थ्यांना शाळेत दाखल करुन घेण्यात आले आहे. विद्यार्थ्यांची गळती रोखण्यासाठी जिल्ह्यात पालक भेट अभियान राबविण्यात आले असून, या अभियानात सतत गैरहजर राहणाऱ्या विद्यार्थ्यांच्या पालकांना भेटून त्यांना शाळेत दाखल करण्यात आले आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**बहाळ कसबे (ता.पाचोरा, जि.जळगांव) येथील पाण्याच्या टाकीची दुरवस्था झाल्याबाबत**

**(५) ५२४६९ (२५-०४-२०१६). श्री.उन्मेश पाटील (चाळीसगाव) :** सन्माननीय **पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बहाळ कसबे (ता.पाचोरा, जि.जळागांव) येथील पाण्याची टाकी जुनी झालेली असुन कोसळण्याची शक्यता निर्माण झाली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर पाण्याच्या टाकीची शासनाने पाहणी केली आहे काय व पाहणीचे निष्कर्ष काय आहेत त्यानुसार सदर गावास दुसरी पाण्याची टाकी बांधून गावकऱ्यांचा पाण्याचा प्रश्न सोडविण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. बबनराव लोणीकर (०८-०८-२०१७)** :(१) होय.
(२) सदर पाण्याच्या टाकीचा टॉप स्लॅब कोसळला असून कॉलम व बीमला क्रॅक गेलेले आहेत. याबाबत एस.एस.व्ही.पी.कॉलेज ऑफ इंजिनियरिंग धुळे या कॉलेजच्या स्ट्रक्चरल इंजिनियर यांनी सदरील पाण्याच्या टाकीची पहाणी केली असून त्यांच्या अहवालानुसार पाण्याची टाकी पाडण्याबाबत त्यांनी शिफारस केली आहे. बहाळ कसबे गावास दुसरी नव्याने टाकी बांधणेबाबत देखभाल व दुरुस्ती अंतर्गत कार्यवाही करुन गावकऱ्यांचा पाण्याचा प्रश्न सोडविण्यात येणार आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## राज्याच्या शिक्षण विभागाच्या १९८६ च्या शासन निर्णयान्वये १२ वी पर्यंत मुलींना मोफत शिक्षण देण्यातबाबत

**(६) ५६२३७ (२२-०८-२०१६). श्री.बाबुराव पाचर्णे (शिरुर) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्याच्या शिक्षण विभागाने १९८६ मध्ये निर्गमित केलेल्या शासन निर्णयानुसार १२ वी पर्यंत मुलींना मोफत शिक्षण देण्यात येत आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, मोफत शिक्षण केवळ ३०० रुपयांच्या शुल्कापर्यंतच मर्यादित असून, प्रत्यक्षात महाविद्यालय विद्यार्थीनीकडून प्रयोगशाळा ते ओळखपत्राच्या कारणांस्तव ५०० ते २५०० रुपयांपर्यंतचे शुल्क आकारत असल्याचे दिनांक २५ मे, २०१६ मध्ये वा त्या सुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(३) असल्यास, राज्यातील अनुदानीत व विनाअनुदानीत विद्यालयामध्ये विद्यार्थीनीकडून जर्नल फी, लायब्रर फी, लॅबोरेटरी फी, जिमखाना फी इत्यादिच्या नावाखाली हजारो रुपयांचे शुल्क आकारत आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे (२१-०८-२०१७)** :(१) होय. दि. ६ मार्च, १९८६ च्या शासन निर्णयान्वये इ. १२ वी पर्यंत मुलींना मोफत शिक्षण देण्यात येते.
(२) व (३) नाही.

सद्य:स्थितीत इयत्ता १२ वी पर्यंतच्या विद्यार्थ्यांनींना शासन मान्य अनुदानित प्राथमिक व उच्च माध्यमिक शाळा, कनिष्ठ महाविद्यालये यातील मुलींना प्रवेश फी, सत्र फी व प्रयोगशाळा फी यांची प्रतीपूर्ती करण्याबाबत तसेच शासन मान्य अशासकीय विना अनुदानित प्राथमिक शाळा, अशासकीय माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळा/ कनिष्ठ महाविद्यालये यातील मुलींना शिक्षण फी, सत्र फी व प्रयोगशाळा फी प्रमाणित दरा इतकी माफ करण्याचा निर्णय घेतला आहे. त्यानुसार प्रमाणित दराच्या मर्यादेपर्यत फी माफ करण्यात येते.

(४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## लोहा-कंधार (जि.नांदेड) तालुक्यातील खासगी विना अनुदानित शाळेत पहिली ते आठवीपर्यंतच्या विद्यार्थ्यांना मोफत पुस्तके देणेबाबत

**(७) ६०९५७ (२२-०८-२०१६). श्री.वसंतराव चव्हाण (नायगांव), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) लोहा-कंधार (जि.नांदेड) तालुक्यातील खासगी विना अनुदान शाळेत वर्षभरात विद्यार्थी संख्येचा मासिक अहवाल असलेल्या पहिली ते आठवीपर्यंतच्या विद्यार्थ्यांचे शिक्षण वाया जावू नये यासाठी मोफत पुस्तके द्यावीत, अशी मागणी रासपचे जिल्हाध्यक्ष यांनी शिक्षण विभागाकडे केली असल्याचे माहे मे, २०१६मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करणार आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे (२५-०९-२०१७) :**(१) हे खरे आहे.

(२) सर्व शिक्षा अभियान या केंद्रपुरस्कृत योजनेंतर्गत मोफत पाठ्यपुस्तके योजना राबविण्यात येते. सदर योजनेंतर्गत केंद्रशासनाच्या मार्गदर्शक सूचनांनुसार इ. १ ली ते ८ वी मधील खाजगी अनुदानित व अंशत: अनुदानित, शासनाच्या व स्थानिक स्वराज्य संस्थांच्या शाळा इ. मधील विद्यार्थ्यांना मोफत पाठ्यपुस्तकांचे वितरण करण्यात येते.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठात वित्त व लेखा अधिकाऱ्याची नियमबाहय नियुक्तीबाबत

**(८) ६४२१८ (२२-०८-२०१६). श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी) :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठात वित्त व लेखा अधिकारी पदासाठी पात्र नसतानासुध्दा श्री हिवसे यांची करण्यात आलेली नियुक्ती नियमबाहय असल्याचा आरोप

लेखी पत्राव्दारे उच्च शिक्षण सहसंचालकांनी नागपूर विद्यापीठाचे कुलगुरूंना कळविले असल्याचे दिनांक ३० जून, २०१६ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, नागपूर विद्यापीठात दिनाक २८ जून, २०१६ रोजी वित्त व लेखा अधिकारी पदाच्या निवडीबाबत व्यवस्थापन परिषदेची चर्चा सुरू असतांना उच्च शिक्षण सहसंचालकांनी श्री हिवसे यांच्या अर्हतेच्या कागदपत्राची मागणी केली असता सदर कागदपत्र दाखविण्यात आले नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, शासनाने या प्रकरणाची चौकशी करून संबधितावर कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे (२२-०८-२०१७) :**(१) होय, हे खरे आहे.

(२) होय हे खरे आहे.

(३) डॉ. राजू हिवसे, वित्त व लेखाधिकारी राष्टसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ, नागपूर यांच्या नियुक्तीसंदर्भात विभागीय सहसंचालक, उच्च शिक्षण, नागपूर यांनी घेतलेले आक्षेप तसेच AICTE च्या दिनांक ३१.०७.१९९५ व विद्यापीठ अनुदान आयोगाच्या दिनांक १४.१०.२०१३ च्या पत्रातील तरतुदी आणि निवड समितीच्या शिफारशी विचारात घेऊन महाराष्ट्र विद्यापीठ अधिनियम-१९९४ मधील कलम २० (१) बी नुसार विद्यापीठाच्या व्यवस्थापन परिषदेने दिलेल्या मान्यतेनुसार डॉ. हिवसे यांची नियुक्ती नियमानुसार असल्याचे आढळून आले.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**लातूर (जि.लातूर) शहरात अल्पसंख्याक मुलींच्या वसतिगृहासाठी निधी उपलब्ध करुन देणेबाबत**

**(९) ६५०९५ (१६-१२-२०१६). श्री.अमित विलासराव देशमुख (लातूर शहर), श्री.नसीम खान (चांदिवली), श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी) :** सन्माननीय **अल्पसंख्यांक विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) लातूर (जि.लातूर) शहरात अल्पसंख्यांक समाजातील मुलींचे शिक्षणातील प्रमाण वाढविण्यासाठी शासनाने स्वतंत्र वसतीगृह बांधकामासाठी रूपये ५ कोटींचा निधी मंजूर केला, हे खरे आहे काय,

(२) असल्यास,सदरच्या वसतीगृहाचे बांधकाम माहे डिसेंबर, २०१५ मध्ये सुरू करण्यात आले असून, निधी अभावी गत तीन महिन्यापासून बंद असल्याची बाब माहे सप्टेंबर, २०१६ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आली, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास,याबाबत मा.विरोधी पक्षनेता विधानसभा यांनी दिनांक १० ऑक्टोबर, २०१६ रोजी वा त्या सुमारास मा.शिक्षण मंत्री यांना निधी उपलब्ध करून देण्याबाबत विनंती केली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार उपरोक्त वसतीगृहाच्या बांधकामासाठी पुरेसा निधी देण्याबाबत कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे (०८-०८-२०१७)** :(१) अंशत: खरे आहे. रु.४.९८ कोटी इतक्या रक्कमेच्या वसतीगृहाच्या बांधकाम अंदाजपत्रकास प्रशासकीय मान्यता देण्यात आली आहे.
(२) नाही. याकरिता दि.१० सप्टेंबर, २०१५ रोजीच्या शासन निर्णयान्वये रु.१.०० कोटी इतका निधी वितरित करण्यात आला होता. त्यापैकी रु.६५.०० लाख इतका निधी खर्च झाला आहे. सदर वसतीगृहाचे बांधकाम प्रगतीपथावर आहे.
(३) नाही.
(४) शासन निर्णय दि.१५/३/२०१७ अन्वये लातूर येथील वसतीगृहाच्या बांधकामासाठी रु.२५.०० लाख इतका निधी वितरीत करण्यात आला आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## कोल्हापूर, सांगली, सातारा, सोलापूर, रत्नागिरी व सिंधुदुर्ग या जिल्ह्यात उभारण्यात येत असलेल्या क्रिडा संकुलाच्या सुरक्षेबाबत

**(१०) ६५८३३ (१६-१२-२०१६). श्री.सत्यजीत पाटील-सरुडकर (शाहूवाडी) :** सन्माननीय **क्रीडा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) कोल्हापूर, सांगली, सातारा, सोलापूर, रत्नागिरी व सिंधुदुर्ग या जिल्ह्यातील क्रिडा संकुलाच्या पहिल्या टप्प्याचे काम पूर्णत्वास येत आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर क्रिडा संकुलांना सुरक्षा रक्षक नसल्याने आजूबाजूच्या परिसरातील लोकांनी कचरा टाकल्याचे तसेच भटकी जनावरे तेथे फिरत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(३) असल्यास, शासनाने या क्रिडा संकुलातील समस्यांबाबत तसेच सुरक्षा यंत्रणा कार्यान्वित करण्यासाठी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे (१६-०९-२०१७) :**(१) होय, हे अंशत: खरे आहे.
जिल्हा क्रीडा संकुल, सांगली, सातारा व सोलापूर काम पूर्ण झालेले असून वापर सुरु आहे.
तसेच, रत्नागिरी व सिंधुदुर्गचे काम पहिल्या टप्प्याचे काम झालेले असून संकुलाचा वापर सुरु आहे.

कोल्हापूर येथील जिल्हा क्रीडा संकुलाचे रुपांतर विभागीय क्रीडा संकुल म्हणून करण्यास शासन मान्यता देण्यात आली आहे.

(२) हे खरे नाही.
(३) कोल्हापूर, सांगली, सातारा, सोलापूर, रत्नागिरी व सिंधुदुर्ग जिल्हा क्रीडा संकुल समितीच्या मार्फत सुरक्षा रक्षक कार्यरत आहेत.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## राज्यातील संगणक शिक्षकांनी आपल्या विविध मागण्यांसाठी मुंबईतील आझाद मैदानामध्ये काढलेला मोर्चा

**(११) ६६१४५ (०५-०१-२०१७). श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.अजित पवार (बारामती), श्री.किसन कथोरे (मुरबाड), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.राणाजगजीतसिंह पाटील (उस्मानाबाद) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील संगणक शिक्षकांनी आपल्या विविध मागण्यांसाठी दिनांक २२ ऑगस्ट, २०१६ रोजी वा त्या सुमारास मुंबईतील आझाद मैदानामध्ये धडक मोर्चा काढून आंदोलन केले होते, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, संगणक शिक्षकांच्या मागण्यांचे थोडक्यात स्वरुप काय आहे व त्यानुसार राज्यातील संगणक शिक्षकांच्या समस्या सोडविण्यासाठी कोणती आवश्यक कार्यवाही करण्यात आली वा येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे (०५-०८-२०१७) :**(१) राज्यातील संगणक शिक्षकांच्या विविध मागण्यांबाबत दि.०७/११/२०१६ रोजीचे निवेदन प्राप्त झाले आहे.
(२) व (३) नियमित वेतन देणे, भ.नि.नि. पावत्या देणे, सेवापुस्तके देणे, कायमस्वरुपी सेवेत सामावून घेणे, रजा विषयक लाभ देणे, वेतनश्रेणी लागू करणे, वरीष्ठ / निवड श्रेणी लागू करणे, सेवांतर्गत बीएडची सुविधा करणे, संचमान्यतेत समावेश करणे इ. मागण्यांसाठी आयसीटी निदेशकांकडून पाठपुरावा करण्यात येत आहे.

आयसीटी ही केंद्र पुरस्कृत योजना राज्यात Built, Own, Operate and Transfer (BOOT MODEL) तत्वावर ५ वर्षे कालावधीसाठी निविदेद्वारे नियुक्त करण्यात आलेल्या एजन्सीद्वारे राबविण्यात येते. निविदेनुसार निवडण्यात आलेल्या एजन्सी समवेत झालेल्या करारानुसार संगणक निदेशक कंत्राटी तत्वावर संबंधित एजन्सीकडून नियुक्त करण्यात येतात. आयसीटी योजनेच्या टप्पा २ व ३ अंतर्गत एजन्सीबरोबर करण्यात आलेल्या करारनाम्यानुसार संगणक निदेशकांना अदा करावयाचे मानधन, प्रॉव्हिडंट फंड, व्यवसायकर इ. ची जबाबदारी संबंधित एजन्सीची आहे.

---

## राज्यातील पालिका शाळांमधील विद्यार्थीनींना देण्यात येणारा उपस्थिती भत्ता मिळाला नसल्याबाबत

**(१२) ६८५४२ (१६-०१-२०१७). श्री.दत्तात्रय भरणे (इंदापूर), श्री.वैभव पिचड (अकोले), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.नरहरी झिरवाळ (दिंडोरी), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.हसन मुश्रीफ (कागल), श्रीमती दिपिका चव्हाण (बागलाण), श्री.शामराव ऊर्फ बाळासाहेब पाटील (कराड उत्तर), श्री.दिपक चव्हाण (फलटण) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील पालिका शाळेतील विद्यार्थीनींची गळती थांबावी म्हणून देण्यात येणारा उपस्थिती भत्ता माहे ऑगस्ट, २०१६ अखेर मिळाला नसल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, पालिका शाळेतील मुलींचा थकीत असलेला उपस्थिती भत्ता देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे (२५-०९-२०१७) :**(१) हे खरे नाही.

(२) व (३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## राज्यातील शाळाबाहय मुलांच्या सर्वेक्षणाची नोंद शासनाकडे नसल्याबाबत

**(१३) ६९२३३ (०५-०१-२०१७). श्री.राहुल बोंद्रे (चिखली), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात राईट टू एज्युकेशनच्या सेक्शन ११ अंतर्गत शाळाबाहय मुलांचे सर्वेक्षण दरवर्षी व्हायला हवे, प्रत्येक वर्षी अद्ययावत माहिती मिळायली हवी याबाबत शासनाने स्थानिक स्वराज्य संस्थांना काय निर्देश दिले आहेत अशी विचारणा उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठाने केली असल्याचे माहे ऑगस्ट, २०१६ मध्ये वा त्या दरम्याने निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, खंडपीठाने केलेल्या विचारणेनुसार निर्णय घेऊन शाळाबाहय मुलांचे सर्वेक्षण करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे (१६-०९-२०१७) :**(१) होय.

(२) शासन पत्र क्र. संकीर्ण-२०१६/ प्र.क्र.५७/एस.डी.४, दि. ९ डिसेंबर, २०१६ अन्वये सर्व क्षेत्रीय अधिका-यांना माहे जानेवारी, २०१७ ते फेब्रुवारी, २०१७ या कालावधीत आपापल्या जिल्हयातील सर्व शाळाबाहय मुलांचा सर्च करुन त्यांना शिक्षणाच्या मुख्य प्रवाहात दाखल करण्याबाबत व सर्व मुलांची नोंद सरल प्रणालीत करण्याबाबत निदेश देण्यात आले आहेत.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## अहमदनगर जिल्ह्यात दोन लाख विद्यार्थी आधारकार्डापासून वंचित असल्याबाबत

**(१४) ६९३८३ (०५-०१-२०१७). श्री.वैभव पिचड (अकोले) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अहमदनगर जिल्ह्यात दोन लाख विद्यार्थी आधारकार्डापासून वंचित असल्याचे माहे ऑगस्ट, २०१६ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनामार्फत चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व तद्नुसार वंचित मुलांना आधारकार्ड देणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे (०५-०८-२०१७) :**(१) अंशत: खरे आहे.

(२), (३) व (४) अहमदनगर जिल्हयात इ.१ ली ते १२ वी एकूण विद्यार्थी संख्या ९,५५,७६२ असून, त्यापैकी ८,५७,३३३ विद्यार्थ्यांचे आधारकार्ड काढून घेण्याबाबतची कार्यवाही झाली आहे. उर्वरित ९८,४२९ विद्यार्थ्यांचे आधारकार्डबाबत मा.निवासी उप जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक अधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय, अहमदनगर येथे तालुक्याचे गटशिक्षणाधिकारी पंचायत समिती सर्व यांचे आढावा बैठकीमध्ये सर्व विद्यार्थ्यांचे आधारकार्ड काढून घेणेबाबत सर्व संबंधित शाळेतील मुख्याध्यापक यांना आदेश देण्याबाबत सूचना देण्यात आल्या आहेत. त्यानुसार शाळा स्तरावर तसेच तालुका स्तरावर विद्यार्थ्यांचे आधारकार्ड काढून घेण्याबाबतची कार्यवाही सुरु आहे.

---

## परभणी जिल्ह्यातील सर्व घोषित अघोषित विनाअनुदानीत शाळेतील शिक्षकांना १०० टक्के अनुदान तात्काळ वितरित करण्याबाबत

**(१५) ७०६६१ (०५-०१-२०१७). डॉ.राहूल पाटील (परभणी) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) परभणी जिल्ह्यातील सर्व घोषित अघोषित विनाअनुदानीत शाळेतील शिक्षकांना १०० टक्के अनुदान तात्काळ वितरित करावे, सर्व शिक्षकांचे वेतन दरमहा एक तारखेलाच करावे व इतर मागण्यांचे निवेदन शिक्षक भारती संघटनेच्या वतीने दिनांक २१ ऑगस्ट, २०१६ रोजी वा त्यासुमारास जिल्हाधिकारी परभणी यांना देण्यात आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मागण्यांच्या संदर्भात शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे (१८-०९-२०१७) :**(१) नाही.

(२) व (३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**ग्रामीण व दुर्गम भागातील विद्यार्थ्यांना परीक्षा शुल्काची रक्कम माफ करण्याच्या निर्णयाबाबत**

**(१६) ७३८५२ (२०-०४-२०१७). श्री.अमित विलासराव देशमुख (लातूर शहर), श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) दुष्काळग्रस्त भागातील ज्या विद्यार्थ्यांनी माहे मार्च, २०१६ मध्ये १० वी १२ वीची परीक्षा दिली आहे त्यांचे परीक्षा शुल्क माफ करण्याचा निर्णय शासनाने घेतला असून त्यासाठी आर्थिक तरतूदही केली आहे मात्र संबंधीत विद्यार्थ्यांचे बँकेत खाते नसल्याने उक्त परीक्षा शुल्क मिळाले नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, बँकेत खाते नसलेल्या विद्यार्थ्यांचे परीक्षा शुल्क परत करु नये असा शासनाने निर्णय घेतला असून उक्त परिक्षा शुल्क विद्यार्थ्यांना परत करण्यासाठी कालमर्यादा ठरवून दिली आहे काय, तसेच शुल्काची रक्कम रोखीने देणार आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे कय आहेत ?

**श्री. विनोद तावडे (१६-०९-२०१७) :**(१) व (२) नाही. राज्यातील टंचाईग्रस्त भागातील विद्यार्थ्यांची (इयत्ता १० वी व इ.१२ वी) परीक्षा फी माफ योजनेसाठी राज्य मंडळास शासनाने एकूण ८,८६,४५४ विद्यार्थ्यांसाठी रु.३१,४८,६६,५१०/-एवढी रक्कम मंजूर केली होती. त्यापैकी एकूण ६,८६,५५३ विद्यार्थ्यांची परीक्षा फी माफी/प्रतिपूर्ती करीता रु. २२,७७,३९,१३०/- एवढी रक्कम खर्च करण्यात आली आहे. उर्वरित विद्यार्थ्यांच्या परीक्षा फी प्रतिपुर्तीची कार्यवाही सुरु आहे.

(३) व (४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**एव्हॉन लाईफ सायन्सेस या कंपनीची तपासणी करताना निष्काळजीपणा केल्याबद्दल अन्न व औषध प्रशासनातील अधिकाऱ्यांविरुध्द कारवाई करण्याबाबत**

**(१७) ७४५४५ (२०-०४-२०१७). श्री.सरदार तारासिंह (मुलुंड), श्री.नितेश राणे (कणकवली), श्री.शरददादा सोनावणे (जुन्नर) :** सन्माननीय **अन्न व औषध प्रशासन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) ठाण्यात सापडलेल्या ‘इफेड्रिन’या अंमली पदार्थाच्या कथित साठयाशी संबंधित असलेल्या ‘एव्हॉन लाईफ सायन्सेस’ या कंपनीची तपासणी करताना दाखविलेल्या निष्काळजीपणाबाबत दक्षता अधिकारी हरिश बैजल यांनी आपला अहवाल शासनाकडे सादर केला असून सदर अहवालानुसार अन्न व औषध प्रशासनातील सात अधिकाऱ्यांविरूध्द अंमली पदार्थ प्रतिबंध कायद्यातील ५९ अन्वये कारवाई करायची झाल्यास याबाबत नारकोटिक्स कंट्रोल ब्युरो या प्राधिकरणाचे अभिप्राय प्राप्त झाले आहेत, हे खरे आहे काय,

(२) तसेच सदरहू कंपनीची तपासणी करताना दाखविलेल्या निष्काळजीपणाबद्दल अन्न व औषध प्रशासनातील संबंधित अधिकाऱ्यांवर कारवाई करण्यासाठी विधी व न्याय विभागाचे अभिप्राय प्राप्त झाल्यानंतर कोणतीही संदिग्धता राहू नये म्हणून प्रकरण मा.महाअधियोक्ता यांचेकडे सादर करण्यात आलेल्या प्रकरणी अभिप्राय प्राप्त झाले आहे काय,
(३) असल्यास, याप्रकरणी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश बापट (१५-०९-२०१७) :**(१), (२) व (३) होय. त्यानुषंगे आयुक्त, अन्न व औषध प्रशासन यांनी सदर प्रकरणातील कायदे व तांत्रिक बाबींचा अभ्यास करुन निष्कर्ष साध्य करण्याकरिता विधी, रसायनशास्त्राचा अभ्यास असणारे प्राध्यापक व तांत्रिक ज्ञान असणाऱ्या व्यक्तींचा समावेश करुन दि.२०.०४.१७ रोजी समिती गठीत करण्यात आली असून, अन्न व औषध प्रशासनाने या समितीचा अहवाल दि.५.०६.२०१७ अन्वये शासनास सादर केला आहे. सदर अहवालाबाबत आवश्यक कार्यवाही करण्यात येत आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**शासनमान्य नसलेली कर्सिव्ह लिपी इंग्रजी माध्यमांच्या शाळांमध्ये शिकवली जात असल्यबाबत**

**(१८) ७४५६१ (२०-०४-२०१७). श्री.मंगलप्रभात लोढा (मलबार हिल), श्री.अजय चौधरी (शिवडी), श्रीमती तृप्ती सावंत (वांद्रे पूर्व) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्य शासनाच्या इंग्रजी माध्यमांच्या शाळांमध्ये मोठ्या प्रमाणात शासनमान्य नसलेली कर्सिव्ह लिपी पहिलीपासूनच्या विद्यार्थ्यांना शिकवली जात असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उपरोक्त कर्सिव्ह लिपी विद्यार्थी आणि शिक्षकांना त्रासदायक असल्यामुळे सदर लिपी रद्द करण्याबाबत मुंबई माध्यमिक शाळा मुख्याध्यापक संघटनेने शासनाच्या शिक्षण विभागाकडे निवेदन देऊन मागणी केली असल्याचे माहे जानेवारी, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, शासनाने कर्सिव्ह लिपी बंद करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, तसेच कार्यवाहीची सद्य:स्थिती काय आहे वा यासाठी किती कालावधी लागणार आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे (१६-०९-२०१७) :**(१) व (२) हे खरे नाही.
(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**चंद्रपूर जिल्हयातील गावांमध्ये दूषित व फ्लोराईडयुक्त पाणी पुरवठा होत असल्याबाबत**

**(१९) ७६०२५ (२०-०४-२०१७). श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.अब्दुल सत्तार (सिल्लोड), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.सुनिल केदार (सावनेर), श्री.अमर काळे (आर्वी) :** सन्माननीय **पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) चंद्रपूर जिल्हयातील ३७२ गावे फ्लोराईड युक्त पाण्याने बाधित असून पुण्याच्या भूजल सर्वेक्षण विकास यंत्रणेच्या संचालकांकडे असलेल्या नोंदीनुसार ४८८ गावांमध्ये दुषित पाणीपुरवठा होत असल्याची बाब माहे डिसेंबर, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त ठिकाणच्या फ्लोराईड युक्त विषारी पाणी पिण्यामुळे हजारो लोकांना फ्लोरोसिस व अस्थीव्यंगासह इतर आजाराची लागण झाली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले व त्यानुसार प्रदुषण कमी करण्याच्या दृष्टीने व शुध्द पाणी पुरवठा करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. बबनराव लोणीकर (२१-०८-२०१७)** :(१) व (२) हे अंशत: खरे आहे.

फ्लोराईडयुक्त दुषित पाण्याचा पुरवठा होत असल्याने रुग्णांना हाडाचे आजार व दातांचे आजारांना सामोरे जावे लागत आहे.

(३) व (४) सन २०१४-२०१५ मध्ये पिण्याच्या पाण्याच्या स्त्रोताचे रासायनिक परिक्षण अभियानात जिल्हयात प्रामुख्याने ३७२ गावाचे पिण्याच्या पाण्याचे स्त्रोत फ्लोराईडयुक्त आढळून आले असून,त्यापैकी ३३६ गावात स्वतंत्र्य नळ योजना, प्रादेशिक नळ योजना, सौरऊर्जापंपाव्दारे शुध्द पाणी पुरवठा होत आहे,उर्वरित ३६ गावांपैकी सन २०१६-२०१७ मध्ये जलस्वराज्य प्रकल्प-२ अंतर्गत १५ गावे समाविष्ठ आहेत. राष्ट्रीय ग्रामीण पेयजल योजने अंतर्गत ०४ गावांमध्ये कामे प्रगतीपथावर असून राष्ट्रीय ग्रामीण पेयजल कार्यक्रम कृती आराखडा सन २०१६-१७ मध्ये ०३ गावे, सन २०१७-२०१८ मध्ये ०२ गावे व मुख्यमंत्री पेयजल कार्यक्रम २०१६-१७ मध्ये ०१ गाव समाविष्ठ करण्यांत आलेली आहेत. तसेच ११ गावांचा समावेश जलस्वराज्य टप्पा -२ अंतर्गत सन २०१७-२०१८ मध्ये प्रस्तावित करण्यात येणार आहे.

४८८ गावांपैकी १६४ गावामधील स्त्रोत फ्लोराईड बाधीत, २५४ स्त्रोत नायट्रेड बाधीत, १८ गावे टिडीएस बाधीत ४१ गावे आयर्नबाधीत,११ गावे क्लोराईड बाधीत, असून ह्या गावांपैकी ४७८ गावांना स्वतंत्र नळ योजना,प्रादेशिक नळ योजना, सौरउर्जापंपाव्दारे शुध्द पाणी पुरवठा होत आहेत. उर्वरित १० गावांपैकी राष्ट्रीय ग्रामीण पेयजल कार्यक्रमातंर्गत ०२ गावामध्ये पाणी पुरवठा योजना प्रगतीपथावर असून, राष्ट्रीय ग्रामीण पेयजल कार्यक्रम कृती आराखडा सन २०१७-२०१८ मध्ये ०८ गावे प्रस्तावित आहे. त्यामुळे सर्व फ्लोराईडयुक्त गावे हाताळण्यात येत आहेत.

---

**राज्यातील शाळांत माध्यान्ह भोजन योजनाकरिता केंद्राकडून प्राप्त झालेल्या निधीचा वापर केला जात नसल्याबाबत**

**(२०) ७८३०२ (२०-०४-२०१७). श्री.सुनिल राऊत (विक्रोळी), श्री.संजय सावकारे (भुसावळ) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील वंचित घटकांतील मुलांना शिक्षणाच्या प्रवाहात आणण्यासाठी सुरु करण्यात आलेल्या मध्यान्ह भोजन योजना अतंर्गत १५ हजार ४४७ शाळांत वेगळया स्वयंपाक घरांची व्यवस्था नाही, तर ७५ टक्के शाळांमध्ये गॅस उपलब्ध नसून, मुंबईतील शाळांत मध्यान्ह भोजन योजना अत्यंत वाईट पध्दतीने चालविली जात असल्याची तसेच गत तीन वर्षात राज्याने केंद्राच्या निधीचा १०० टक्के म्हणजे पूर्ण वापर केला नसल्याची बाब माहे डिसेंबर, २०१६ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शासनने मध्यान्ह भोजन योजना प्रभावीपणे आणि पारदर्शकपणे चालविण्यासाठी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, तसेच त्याचा तपशिल काय आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे (२५-०९-२०१७) :**(१) व (२) हे खरे नाही. शालेय पोषण आहार योजनेंतर्गत आहार शिजविण्यासाठी मंजूर ७१७८३ स्वयंपाकगृहांपैकी सुमारे ५७८३१ स्वंयपाकगृहे कार्यरत असून उर्वरित स्वयंपाकगृहाची बांधकामे सुरु आहेत. तसेच, शाळांमध्ये गॅस कनेक्शन उपलब्ध करुन देण्याचा निर्णय घेण्यात आला असून यानुसार कार्यवाही करण्याचे आदेश क्षेत्रिय यंत्रणांना देण्यात आले आहेत.

केंद्र शासनामार्फत प्राप्त निधी पूर्णपणे वापरण्यात येत असून शालेय पोषण आहार योजना प्रभावीपणे आणि पारदर्शकपणे राबविण्याबाबत वेळोवेळी क्षेत्रिय यंत्रणांना निर्देश देण्यात येतात.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**नागपूर जिल्हयातील जिल्हा परिषदेच्या शेकडो शाळांमधील विद्यार्थ्यांची पटसंख्या २० पेक्षाही कमी असल्याबाबत**

**(२१) ७९०३१ (२०-०४-२०१७). श्री.सुधाकर देशमुख (नागपूर पश्चिम) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नागपूर जिल्हयातील जिल्हा परिषदेच्या शाळांमधील विद्यार्थ्यांची पटसंख्या २० पेक्षाही कमी असल्याची बाब निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त शाळांमधील शिक्षकांना कुठल्याही विभागाची कोणतीही कामे, ज्यामध्ये घरोघरी जाउन शौचालयाची मोजणी करणे, पशुची गणना करणे, अधिका-यांच्या ऑनलाईन बैठका, ऑनलाईन वाढलेली कामे, शालेय पोषण आहार यासारख्या अतिरीक्त कामांमुळेच शिक्षकांचे विद्यार्थ्यांच्या शिकवणी वर्गाकडे दुर्लक्ष होत असल्याने विद्यार्थ्यांची पटसंख्या घसरत जात आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, शासनाने या जिल्हा परिषदेच्या शाळांचा दिवसेंदिवस घसरत जात असलेला दर्जा सुधारण्याकरीता तसेच विद्यार्थ्यांची कमी होत असलेली पटसंख्या वाढविण्याकरीता कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे (११-०८-२०१७) :**(१) अंशत: खरे आहे.
(२) नाही.
(३) जिल्हा परिषदेच्या शाळांचा दर्जा सुधारण्याकरिता प्रगत शैक्षणिक महाराष्ट्र कार्यक्रम संपूर्ण जिल्हयात यशस्वीपणे राबविण्यात येत आहे. या कार्यक्रमांतर्गत ६५% शाळा प्रगत व डीजीटल झालेल्या आहेत. इंग्रजी माध्यमाच्या शाळामधील ७८९ मुलांनी नागपूर जिल्हा परिषदेच्या शाळांमध्ये या शैक्षणिक वर्षात प्रवेश घेतलेला आहे. जिल्हयातील ब-याच गावामध्ये मोठया प्रमाणात लोकसहभाग मिळत असून त्याव्दारे शाळेला लागणा-या भौतिक सुविधा तांत्रिक साधने उपलब्ध होत आहे. प्रगत शैक्षणिक महाराष्ट्र अंतर्गत प्रेरणा कार्यशाळा, परिसंवाद, ज्ञान रचनावादी शाळाभेटी, शिक्षणाची वारी कार्यक्रमाच्या माधमातून शिक्षकांना प्रेरणा मिळत आहे. याव्दारे संपूर्ण नागपूर जिल्हयात जिल्हा परिषद शाळांचा दर्जा सुधारण्यास मोलाची मदत होत आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

### मुंबईतील अंधेरी येथील कोंडिवटे लेणीच्या आजूबाजूला अनधिकृत बांधकाम झाल्याबाबत

**(२२) ८१५५६ (२०-०४-२०१७). श्री.संतोष दानवे (भोकरदन), श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), श्री.शशिकांत शिंदे (कोरेगाव), श्री.अजित पवार (बारामती) :** सन्माननीय **सांस्कृतिक कार्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) अंधेरी (मुंबई) येथील कोंडिवटे लेणी ही प्राचीन लेणी असून ७ व्या शतकामध्ये सातवाहन राजाने बांधलेली आहेत, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदरहू लेणीच्या आजूबाजूला अनधिकृत बांधकाम करण्यात आले असून येथील प्राचीन विहीरींचे झाकण सुद्धा उघडे असल्याचे माहे फेब्रुवारी, २०१७ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदरहू प्राचीन लेणीची दुरवस्था होण्याची कारणे काय आहेत,
(४) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले व त्यानुषंगाने उक्त लेणीची पुरातत्व विभागाकडून जतन करण्याबाबत व अनधिकृत बांधकामांबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे (०५-०८-२०१७) :**(१) नाही.
सदर लेणी ही इ.स.पूर्व २ ते ४ या शतकामधील बौधकालीन लेणी आहेत.

(२) अंशत: खरे आहे.
(३) लवण आणि आर्द्रतायुक्त हवामानामुळे लेणीची दुरावस्था होत आहे.
(४) भारतीय पुरातत्व विभागाकडून सदर लेणीची जतन व दुरूस्ती उपलब्ध निधीतून करण्यात येत आहे. तसेच अतिक्रमण धारकांना भारतीय पुरातत्व विभाग यांचेमार्फत नोटीस बजावण्यात आली आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**बुलडाणा जिल्हयात अल्पसंख्यांक बहूल क्षेत्र विकास कार्यक्रमांतर्गत सादर केलेल्या प्रस्तांवाबाबत**

**(२३) ८१५९७ (२०-०४-२०१७). श्री.हर्षवर्धन सपकाळ (बुलढाणा) :** सन्माननीय **अल्पसंख्यांक विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) बुलडाणा जिल्हयातील देऊळघाट (ता.बुलडाणा) व धामणगांव बढे, रोहिणखेड, कोथळी (ता.मोताळा) येथील अल्पसंख्यांक बहूल क्षेत्र विकास कार्यक्रमांतर्गत शादीखाना मंजूर करणे बाबतचे स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी दिनांक ३ जानेवारी, २०१७ रोजी वा त्या सुमारास मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद बुलडाणा यांना निवेदन दिले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उपरोक्त निवदेनाच्या अनुषंगाने शासनाने चौकशी केली आहे काय,
(३) असल्यास, अल्पसंख्यांक बहूल क्षेत्र विकास कार्यक्रमांतर्गत शादीखाना मंजूर करणे बाबत शासनाने कोणत कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे (२६-०९-२०१७) :**(१) होय.
(२) व (३) अल्पसंख्याक बहुल ग्रामीण क्षेत्र विकास कार्यक्रम योजना राबविण्याकरिता शासन निर्णय दि. २२ सप्टेंबर,२०१५ अन्वये राज्यातील ज्या ज्या ग्रामपंचायतींना अनुज्ञेय पायाभूत सुविधांकरिता अनुदान उपलब्ध करुन घ्यावयाचे असेल, त्या त्या ग्रामपंचायतींचे परिपूर्ण प्रस्ताव संबधित जिल्हाधिकारी यांच्या मान्यतेने त्या आर्थिक वर्षातील दि. ३० नोव्हेंबर पर्यंत शासनास सादर करावयाचे असतात. बुलडाणा जिल्हयातील सदर प्रस्ताव जिल्हाधिकारी कार्यालय, बुलडाणा यांच्यामार्फत उशिरा म्हणजेच मार्च, २०१७ अखेर शासनास प्राप्त झाला होता. त्यामुळे सदर प्रस्ताव पुढील कार्यवाहीकरिता त्या आर्थिक वर्षात सादर करण्यात आलेला नाही.

सदर योजना सन २०१७-१८ या आर्थिक वर्षात सुद्धा राबविण्यात येत असल्याने उपरोक्त ग्रांमपंचायतीचा परिपूर्ण प्रस्ताव मा.लोकप्रतिनिधी तसेच जिल्हाधिकारी, बुलडाणा यांच्या मार्फत शासनास विहीत कालावधीत सादर केल्यास त्यावर उचित कार्यवाही करण्यात येईल.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

### मुंबई विद्यापीठाच्या विद्याथ्यांसाठीची आयटी लॅब दीड वर्षापासून बंद असल्याबाबत

**(२४) ८१८३० (२०-०४-२०१७). श्री.सुनिल राऊत (विक्रोळी), श्री.संजय पोतनीस (कलिना) :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई विद्यापीठाच्या आयडॉलच्या बीएसस्सी आयटी, बीएसस्सी कम्प्युटर सायन्स एमएसस्सी आयटी आणि एमएसस्सी कम्प्युटर सायन्ससह एमसीएच्या अभ्यासक्रमातील विद्यार्थ्यांसाठी काही वर्षापूर्वी सुरू करण्यात आलेले आयटी लॅब दीड वर्षापासून बंद असल्याची बाब माहे, फेब्रुवारी, २०१७ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, यावर्षी प्रथम वर्ष अभ्यासक्रमातील विद्यार्थ्यांचे आतापर्यंत एकही प्रॅक्टिकल न झाल्याने अंतिम निकालावर त्याचा परिणाम होत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणाची शासनाने चौकशी केली आहे काय, व त्यानुसार संबंधित प्रशासनाविरुध्द तसेच सदर आयटी लॅब तात्काळ सुरू करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे (१९-०८-२०१७) :**(१) हे खरे नाही. मुंबई विद्यापीठाच्या आयडॉलमधील माहिती तंत्रज्ञान प्रयोगशाळा (आयटी लॅब) मागील दीड वर्षापासून बंद असून फ्लोअरिंग दुरुस्तीकरिता एक ते दीड महिने लॅब बंद ठेवण्यात आली आहे.

(२) हे खरे नाही. बी.एस.सी.आय.टी. बी.एस.सी. कॉम्प्युटर सायन्स, एम.एस.सी.आय.टी. आणि एमसीए अभ्यासक्रमातील विद्यार्थ्यांचे व्याख्यान, टर्म वर्क, मौखिक प्रॅक्टिकल्स PCP सेंटरमध्ये घेण्यात येतात तसेच एम.एस.सी. कॉम्प्युटर सायन्स या अभ्यासक्रमातील विद्यार्थ्यांसाठी याच कॅम्पसमध्ये व किर्ती महाविद्यालयात सुविधा उपलब्ध करुन देण्यात आली आहे.

(३) संपूर्ण लॅब आधुनिक पध्दतीने तयार करण्याचे प्रयत्न सुरु आहेत.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

### मौजे मार्डा (ता.वरोरा, जि.चंद्रपूर) येथील भारत निर्माण योजनेअंतर्गत निधीची चौकशी करण्याची मागणी

**(२५) ८१९७१ (२०-०४-२०१७). श्री.सुरेश धानोरकर (वरोरा) :** सन्माननीय **पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजे मार्डा (ता.वरोरा, जि.चंद्रपूर) येथील भारत निर्माण योजनेअंतर्गत शासकीय योजनेचा निधी व झालेल्या कामाचा लेखाजोखा तसेच संबधित रेकॉर्ड ग्रामपंचायतीला जमा न केल्याने चौकशी करून कार्यवाही करण्याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधीनी दिनांक १६ जानेवारी, २०१७ रोजी वा त्यासुमारास मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, चंद्रपूर यांना निवेदन दिले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त निवेदनानुसार शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले व त्यानुषंगाने संबंधितावंर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. बबनराव लोणीकर (०९-०८-२०१७)** :(१) व (२) हे खरे आहे.

मौजा मार्डा (ता.वरोरा, जि.चंद्रपूर) येथील भारत निर्माण योजनेअंतर्गत पाणी पुरवठा योजनेच्या झालेल्या कामाचा लेखाजोखा तसेच संबंधीत रेकॉर्ड तत्कालिन पाणी पुरवठा व स्वच्छता समितीने ग्रामपंचायतीकडे जमा न केल्यामुळे, उपविभागीय अभियंता, चिमूर यांनी दिनांक २/२/२०१७ अन्वये समितीस योजनेचे रेकॉर्ड ग्रामपंचायतीला उपलब्ध करण्याबाबत कळविले.

त्यानुसार योजनेचे मोजमाप पुस्तिका, बँकेचे पासबूक, व्हाऊचर बुक, कॅशबुक उपविभागाकडे जमा करण्यात आले. जमा केलेला सर्व दस्तऐवज दिनांक २१/३/२०१७ रोजी ग्रामपंचायतीकडे सुपुर्द करण्यात आलेला आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**पनवेल (जि.रायगड) येथील मोबाईल धारक शिक्षकाचे निलंबन मागे घेण्याची मागणी**

**(२६) ८२६४६ (२०-०४-२०१७). श्री.अमित विलासराव देशमुख (लातूर शहर) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) रायगड जिल्ह्यातील पनवेल येथील शालेय कामकाजादरम्यान मोबाईल वापरणाऱ्या शिक्षकाचे निलंबन नियमबाह्य असून, तातडीने ते मागे घेण्याची मागणी शिक्षक परिषदेने मा.शिक्षण मंत्र्यांकडे केली असल्याचे माहे फेब्रुवारी, २०१७ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, याप्रकरणी शासनाने चौकशी करुन शिक्षक परिषदेच्या मागणीनुसार सदर शिक्षकावरील निलंबनाची कारवाई मागे घेण्याबाबत कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे (०५-०८-२०१७)** :(१) अशा आशयाचे निवेदन प्राप्त झालेले नाही.
(२) या प्रकरणी केलेल्या चौकशीत कार्यालयीन शिस्तीचे, वरिष्ठांच्या आदेशांचे पालन न करणे, कामात हलगर्जीपणा या कारणास्तव पनवेल महानगरपालिका प्राथमिक शाळा क्र.१ मधील एका शिक्षकास म.ना.से. (वर्तणूक) नियम, १९७९ मधील नियम क्र.३ च्या तरतूदीस अनुसरुन दि.३.२.२०१७ पासून निलंबित करण्यात आले होते. दि.८.२.२०१७ रोजी त्याने दिलेल्या माफीनाम्यास अनुसरुन दि.३.४.२०१७ पासून त्याचे निलंबन रद्द करण्यात आलेले आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

### रत्नागिरी जिल्हयातील शाळांमधील किचन शेडसाठीचा निधी अखर्चित असल्याबाबत

**(२७) ८२६५४ (२०-०४-२०१७). श्री.राजन साळवी (राजापूर) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) रत्नागिरी जिल्हयातील शाळांमधील किचन शेडसाठीचा सुमारे २ कोटी रुपयांचा निधी शिक्षण संचालकांकडून मान्यता न मिळाल्याने अखर्चित असल्याची बाब माहे फेब्रुवारी, २०१७ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुसार रत्नागिरी जिल्हयातील शाळांमधील किचन शेडसाठी उपलब्ध असलेल्या निधीचा विनियोग होण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे (२५-०९-२०१७) :**(१) हे खरे आहे.

(२) रत्नागिरी जिल्हयात शालेय पोषण आहार योजनेंतर्गत आहार शिजविण्यासाठी मंजूर ४०५ स्वयंपाकगृह बांधकामापैकी सुमारे २५३ स्वयंपाकगृह बांधकामे पूर्ण झाली आहेत. उर्वरित स्वयंपाकगृह बांधकामे जागा उपलब्ध नसणे, वाहतुकीस रस्ता नसणे, मंजूर अनुदानामध्ये बांधकाम करणे शक्य नसणे, पटसंख्या कमी असणे इ. कारणांमुळे करता येणे शक्य नसल्याने याबाबतचा निधी अखर्चित राहीला आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

### इंद्रायणी नदीत मैलामिश्रीत सांडपाणी सोडल्या प्रकरणी पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेवर दाखल केलेल्या खटल्याबाबत

**(२८) ८४५०४ (२०-०४-२०१७). श्री.सुरेश गोरे (खेड आळंदी) :** सन्माननीय **पर्यावरण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) आळंदी नगरपरिषदेस पिण्याचे पाणी पुरवठा करण्यात येणाऱ्या इंद्रायणी नदीत मैलामिश्रीत सांडपाणी सोडल्या प्रकरणी पिंपरी-चिंचवड महानगर पालिकेवर जल (प्रतिबंधक व प्रदूषण) कायदा १९७४ अंतर्गत मा. मुख्य दंडाधिकारी यांचे न्यायालयात महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळामार्फत दाखल केलेल्या फौजदारी खटल्याचा निकाल लागला आहे काय,

(२) असल्यास, त्याचे स्वरूप काय आहे व मैलामिश्रीत सांडपाणी इंद्रायणी नदीत सोडणाऱ्या महानगर पालिकेवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) असल्यास, उक्त खटल्याचा निकाल लवकर लागण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. रामदास कदम (२१-०८-२०१७)** :(१) व (२) महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळातर्फे अप्रक्रीयाकृत सांडपाण्यावर प्रक्रीया करण्याकरीता मैला शुध्दीकरण प्रक्रीया संयंत्रणा उभारण्यासाठी पिंपरी चिंचवड महानगरपालिकेला दिनांक १८/११/२०१५ व दिनांक २१/०६/२०१६ रोजी समजपत्र बजावण्यात आले आहे. तसेच दिनांक १९/०६/२०१५ व दिनांक ०६/०५/२०१६ रोजी प्रस्थावित आदेश बजावण्यात आले आहेत. तसेच पिंपरी चिंचवड महानगरपालिकेविरुध्द इंद्रायणी नदी जल प्रदूषणास कारणीभूत धरुन, जल (प्रतिबंध व प्रदुषण नियंत्रण) कायदा, १९७४ अन्वये फौजदारी खटला आर.सी.सी. नं.७०९/ २०१६ मा.मुख्य दंडाधिकारी, पुणे यांच्या न्यायालयात दाखल केला आहे. सदर फौजदारी खटल्याचा निकाल लागलेला नाही.

(३) सदर बाब न्यायप्रविष्ठ आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## नागपूर जिल्हा परिषद व महानगरपालिकेच्या शाळेतील विद्यार्थ्यांना गणवेशाच्या अनुदानापासुन वंचीत राहावे लागल्याबाबत

**(२९) ८५०६८ (२३-०८-२०१७). श्री.सुधाकर देशमुख (नागपूर पश्चिम) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) जिल्हा परिषद व नागपूर महानगरपालिकेच्या (जि.नागपूर) शाळेतील १ लाख १२ हजार गरीब विद्यार्थ्यांना राज्याच्या शिक्षण विभागाच्या जाचक अटींमुळे ४.५० कोटी रूपयाच्या गणवेशाच्या अनुदानापासुन वंचीत राहावे लागत असल्याबाबतची बाब माहे जून, २०१७ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, यापुर्वी अनुसूचित जाती, जमाती व इतर मागास प्रवर्गातील विद्यार्थ्यांच्या गणवेषाचे अनुदान शाळेच्या मुख्यध्यापकांना प्राप्त व्हायचे ते अनूदान शाळेच्या व्यवस्थापन समितीच्या समन्वयातुन विद्यार्थ्यांना वितरीत व्हायचे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, शाळांमधील अनेक विद्यार्थ्यांकडे आधारकार्ड व राष्ट्रीयकृत बँकेत संयुक्त खाते उपलब्ध नाही तसेच किती विद्यार्थ्याकडे राष्ट्रीयकृत बँकेचे खाते आहे तसेच किती विद्यार्थ्यांजवळ आधारकार्ड आहे याबाबतची माहीती शाळेच्या व्यवस्थापन समितीकडे देखील उपलब्ध नसल्यामूळे अनेक शाळांनी ही माहीती शिक्षण विभागाला पाठविलेली नाही, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, या प्रकरणी शासनाने विद्यार्थ्यांची माहीती पुरविण्यास दिरंगाई करणाऱ्या शालेय व्यवस्थापन समिती, शिक्षण समिती व शिक्षण विभागाच्या अधिकाऱ्यांवर कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे (२५-०९-२०१७)** :(१) हे खरे आहे.

(२) सर्व शिक्षा अभियानांतर्गत मोफत गणवेश वाटप योजनेसाठी केंद्र शासनाच्या मार्गदर्शक सूचनांनुसार सन २०१६-१७ पर्यंत शाळा व्यवस्थापन समितीमार्फत पात्र विद्यार्थ्यांना गणवेश उपलब्ध करुन देण्यात येत होते.

(३) हे खरे नाही.
(४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**सन २०१६-१७ च्या अर्थसंकल्पातील १६०० कोटी रुपयांच्या तरतूदीपैकी शालेय पोषण आहाराकरीता १२८० कोटी रुपये वितरीत करण्यात आले असल्याबाबत**

**(३०) ८५१०९ (२३-०८-२०१७). श्री.शरददादा सोनावणे (जुन्नर), श्री.सरदार तारासिंह (मुलुंड) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) शालेय शिक्षण विभागाकडून सन २०१६-१७ च्या अर्थसंकल्पातील १६०० कोटी रुपयांच्या तरतूदीपैकी शालेय पोषण आहाराकरीता १२८० कोटी रुपये वितरीत करण्यात आले असूनही कंत्राटदारांची व ठेकेदारांची कोटयावधी रुपयांची देयके अद्यापी थकीत असल्याच्या अनेक तक्रारी शालेय शिक्षण विभागाकडे कंत्राटदार व पुरवठादारांनी केल्या आहेत, हे खरे आहे काय,
(२) तसेच शिक्षण संचालक यांनी दिनांक ३ मार्च, २०१७ रोजीच्या पत्रान्वये राज्यातील सर्व जिल्हा शिक्षण अधिकाऱ्यांना माहे जून, २०१६ ते फेब्रुवारी, २०१७ या काळातील शालेय पोषण आहारावरील करण्यात आलेल्या खर्चाची देयके तातडीने पाठविण्याच्या सक्त सुचना दिल्या असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, शिक्षण संचालकांनी जिल्हा शिक्षण अधिकाऱ्यांना पाठविलेल्या पत्रानुसार एकूण किती जिल्हा शिक्षण अधिकाऱ्यांनी उक्त ९ महिन्यांचा हिशोब सादर केला व त्यामध्ये किती कंत्राटदार व पुरवठादारांची देयके थकीत असल्याचा उल्लेख केला आहे,
(४) असल्यास, दर तीन महिन्यांनी हिशोब सादर करणे आवश्यक असतांनाही, हिशोब सादर करण्यास हेतूत: विलंब करणाऱ्या जिल्हाशिक्षण अधिकाऱ्यांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे (२५-०९-२०१७) :** (१), (२), (३) व (४) सन २०१६-१७ मध्ये शालेय पोषण आहार योजनेसाठी मंजूर तरतुदीच्या प्रमाणात निधी कमी प्रमाणात प्राप्त झाल्याने योजनेंतर्गत प्राप्त तरतुदीतून अन्न शिजविण्याचा खर्च बचत गट व स्वयंपाकी तथा मदतनीस यांना प्राथम्याने निधी उपलब्ध करुन देण्यात आला असून उर्वरित निधीतून धान्यादी मालाच्या खर्चाची रक्कम अदा करण्यात आली आहे.

सदर योजनेंतर्गत सन २०१७-१८ मध्ये प्राप्त निधीतून उर्वरित देयके अदा करण्याची कार्यवाही सुरु आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्य मराठी विकास संस्थेतील कंत्राटी पध्दतीने काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांना कामयस्वरुपी सेवेत घेण्याबाबत**

**(३१) ८५९७७ (२१-०८-२०१७). श्री.अजय चौधरी (शिवडी) :** सन्माननीय **मराठी भाषा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्य मराठी विकास संस्थेतील ५० टक्क्याहून अधिक पदे रिक्त असून केवळ २५ टक्के पदे कायमस्वरुपी व उर्वरित पदे कंत्राटी पध्दतीने भरण्यात आली आहेत, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, गत १९-२० वर्षापासून कंत्राटी पध्दतीने काम करणा-या कर्मचाऱ्यांना कायमस्वरुपी सेवेत घेण्याची मागणी कर्मचाऱ्यांकडून वारंवार करण्यात येत आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, कंत्राटी कर्मचाऱ्यांना कायमस्वरुपी सेवेत घेण्याबाबत व रिक्त असलेली पदे तात्काळ भरण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे (२२-०९-२०१७) :**(१) अंशत: खरे आहे. संस्थेकरिता शासनाने मंजूर केलेल्या १६ पदांपैकी १३ पदे भरलेली असून कंत्राटी पद्वतीने सध्या ८ उमेदवार कार्यरत आहेत.
(२) होय.
(३) कंत्राटी उमेदवारांची भरती संस्थेकडील संबंधित प्रकल्पांकरिता करण्यात येते. कंत्राटी उमेदवारांच्या सेवेतील समावेशनाच्या मागणीबाबत कार्यकारी समिती नियामक मंडळ यांच्या बैठकांमध्ये वेळोवेळी चर्चा झाली आहे. विशिष्ट प्रकल्पांकरिता नियुक्त करण्यात आलेल्या कंत्राटी उमेदवारांच्या सेवा प्रकल्पाच्या समाप्तीनंतर खंडीत करणे आवश्यक असल्याचा निर्णय कार्यकारी समितीच्या बैठकीत घेण्यात आला आहे. संस्थेच्या पदांचे सेवाप्रवेश नियम तयार करण्याचे निदेश संस्थेला देण्यात आले आहेत.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्यात अभियांत्रीकी औषधनिर्माण शास्त्र, व्यवस्थापन अभ्यास क्रमातील पदवी तसेच पदव्युत्तर शिक्षण घेतलेले विद्यार्थी नोकरी पासून वंचित असल्याबाबत**

**(३२) ८६७७६ (२१-०८-२०१७). श्री.प्रकाश आबिटकर (राधानगरी), श्री.चरण वाघमारे (तुमसर) :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यात अभियांत्रीकी औषधनिर्माण शास्त्र, व्यवस्थापन अभ्यास क्रमातील पदवी किंवा पदव्युत्तर शिक्षण घेणाऱ्या लाखो विद्यार्थ्यांना नोकरी पासून वंचित रहावे लागत असल्याने याला सर्वस्वी शासन जबाबदार असल्याची भावना विद्यार्थ्यांन मध्ये निर्माण झाली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, शासनाने भरमसाठ पॉलिटेक्नीक, अभियांत्रीकी कॉलेजला मान्यता दिल्याने बहूसंख्य विद्यार्थी शिक्षण घेवून ही नोकरीच्या प्रतिक्षेत असल्याने ३ कोटीहून अधिक सुशिक्षीत बेरोजगार नोकरीच्या शोधात आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त बेरोजगारांना नोकरी देणेबाबत शासनाने कोणत्या उपाययोजना केल्या आहेत वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे (२५-०९-२०१७) :**(१) नाही.
(२) नाही.

"व्यावसायिक अभ्यासक्रमांच्या नवीन संस्था व अभ्यासक्रमांना मान्यता देण्याचे अधिकार केंद्रीय स्तरावरील अखिल भारतीय तंत्र शिक्षण परिषद, फार्मसी काऊन्सिल ऑफ इंडिया व वास्तुकला परिषद या शिखर संस्थांना आहेत. या शिखर संस्थांनी नविन संस्था / अभ्यासक्रमांना मान्यता दिल्यानंतर राज्य शासनाकडून शासन आदेश निर्गमित करण्यात येतात. सदर शिखर परिषदांनी मान्यता दिल्यानंतर राज्य शासनास मान्यता नाकारण्याचे अधिकार नाहीत त्यामुळे मान्यतेचे आदेश निर्गमित करणे राज्य शासनास क्रमप्राप्त ठरते.

(३) प्रत्येक संस्थेमध्ये Training & Placement Cell अंतर्गत विद्यार्थ्यांसाठी वेगवेगळया आस्थापनांकडून संस्थेमध्ये नोकरीसाठी Campus Interview आयोजित करण्यात येतात. तसेच विविध औद्योगिक आस्थापना/कंपन्यांकडून प्राप्त मागणीनुसार विद्यार्थ्यांना संस्थास्तरावरुन मुलाखतीसाठी पाठविण्यात येते. संबंधीत आस्थापनामार्फत गुणवत्ताधारक व होतकरु विद्यार्थ्यांना नोकऱ्या उपलब्ध करुन देण्यात येतात. मात्र काही विद्यार्थी नोकरीपेक्षा उच्च शिक्षण व स्वत:चे उद्योग सुरु करण्यास इच्छुक असतात.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## राज्यातील पुणे, नागपूर, संभाजीनगर, जळगांव आणि कोल्हापूर मधील अभियांत्रिकी महाविद्यालये अखिल भारतीय तंत्र शिक्षण परिषदेने बंद केल्याबाबत

**(३३) ८७२२४ (२१-०८-२०१७). डॉ.राहूल पाटील (परभणी) :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील पुणे, नागपूर, संभाजीनगर, जळगांव आणि कोल्हापूर मधील एकूण किती अभियांत्रिकी महाविद्यालये अखिल भारतीय तंत्र शिक्षण परिषदेने सन २०१६-१७ या शैक्षणिक वर्षात बंद केली आहेत,

(२) असल्यास, सदर अभियांत्रिकी महाविद्यालये बंद करण्याची कारणे काय आहेत,

(३) असल्यास, शासनाने सदर अभियांत्रिकी महाविद्यालयातील विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक भवितव्याबाबत कोणत्या पर्यायी उपाययोजना केल्या आहेत वा त्यानुषंगाने कार्यवाहीची सद्य:स्थिती काय आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे का आहेत ?

**श्री. विनोद तावडे (२५-०९-२०१७) :**(१) एकूण ४ अभियांत्रिकी महाविद्यालये बंद केली आहेत.

(२) संस्थांनी अखिल भारतीय तंत्र शिक्षण परिषदेकडे महाविद्यालये बंद करण्यासाठी अर्ज केल्यानुसार बंद केली आहेत.

(३) सदर अभियांत्रिकी महाविद्यालये टप्प्याटप्प्याने बंद होत असल्यामुळे नियमित विद्यार्थी पुढील शिक्षण होईपर्यंत त्याच महाविद्यालयात शिक्षण पूर्ण करीत असल्याने विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक भवितव्याबाबत प्रश्न निर्माण होत नाही. त्यामुळे पर्यायी उपाययोजना करण्याची आवश्यकता नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**सोलापूर जिल्ह्यातील जिल्हा ग्रंथालयासह अनेक ग्रंथालये भाड्याच्या जागेत सुरु असल्याबाबत**

**(३४) ८८०२४ (२१-०८-२०१७). श्री.नारायण पाटील (करमाळा) :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सोलापूर जिल्ह्यातील जिल्हा ग्रंथालयासह अनेक ग्रंथालये भाड्याच्या जागेत सुरु आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, जिल्ह्यात अ, ब, क व ड श्रेणीतील सरकारमान्य किती ग्रंथालये आहेत व या ग्रंथालयांना देण्यात येणारे अनुदान तुटपुंजे असल्याने अनेक ग्रंथालये बंद पडण्याच्या अवस्थेत आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, व त्यानुषंगाने जिल्ह्यातील सुरु असलेल्या शासनमान्य ग्रंथालयात फर्निचरसह इतर सुविधा तसेच स्वतःची जागा देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे (२१-०९-२०१७) :**(१) सोलापूर जिल्ह्यातील शासनमान्य सार्वजनिक जिल्हा ग्रंथालय, तालुका ग्रंथालय आणि इतर "अ" वर्ग ग्रंथालये स्वत:च्या जागेत कार्यरत आहेत. जिल्हा ग्रंथालय अधिकारी कार्यालय, सोलापूर (शासकीय जिल्हा ग्रंथालय) हे सद्य:स्थितीत भाडेतत्वावरील जागेत कार्यरत आहे.

(२) हे खरे नाही.

दि. ३१ मार्च, २०१७ अखेर सोलापूर जिल्ह्यात एकूण ९४७ शासनमान्य ग्रंथालये खालीलप्रमाणे कार्यरत आहेत-

| **ग्रंथालयाचा दर्जा** | **ग्रंथालय संख्या** |
|---|---|
| जिल्हा अ | १ |
| तालुका अ | ८ |
| इतर अ | ११ |
| तालुका ब | ३ |
| इतर ब | २५१ |
| इतर क | ४०४ |
| ड वर्ग | २६९ |
| **एकूण ग्रंथालये** | **९४७** |

(३) शासनमान्य सार्वजनिक ग्रंथालये ही खाजगी संस्थांकडून चालविली जातात. शासनमान्य ग्रंथालयांना राजा राममोहन रॉय ग्रंथालय प्रतिष्ठान, कोलकाता व शासनाच्या माध्यमातून समान निधी योजनेंतर्गत फ़र्निचर पुरविण्यात येते. निधी उपलब्धतेनुसार शासनमान्यता प्राप्त ग्रंथालयांसाठी इमारत व साधन सामग्रीसाठी अनुदान देण्यात येते.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्यातील ग्रंथालयीन कर्मचाऱ्यांना वेतनश्रेणी व सेवा शर्ती लागू करण्याबाबत**

**(३५) ८८१९१ (२१-०८-२०१७). श्री.सुभाष उर्फ पंडितशेठ पाटील (अलिबाग), श्री.धैर्यशील पाटील (पेण), श्री.जयंत पाटील (इस्लामपूर) :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महाराष्ट्र राज्यातील सुमारे ११९३२ शासन मान्य ग्रंथालये कार्यरत असून ग्रंथालयामध्ये जवळपास २० हजार ग्रंथालयीन कर्मचारी कार्यरत आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, संबंधीत कर्मचाऱ्यांनी ग्रंथालयीन सेवकांना वेतन श्रेणी व सेवा शर्ती ची अट लागू करण्याबाबतची मागणी दिनांक २९ मे, २०१७ रोजी वा त्यासुमारास केली असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, शासनाने संबंधीत सेवकांना वेतन श्रेणी व सेवाशर्ती लागू करण्यासंदर्भात कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे (१२-०९-२०१७) :**(१) राज्यात दि. ३१ मार्च, २०१७ अखेर १२,१४५ शासनमान्य सार्वजनिक ग्रंथालये आहेत. या ग्रंथालयांमध्ये सुमारे २१,६०६ कर्मचारी मानधनावर कार्यरत आहेत.

(२) राज्यातील सार्वजनिक ग्रंथालय सेवकांना वेतनश्रेणी व सेवाशर्ती व इतर मागण्यासंदर्भात दि. २३/०५/२०१७ चे निवेदन प्राप्त झालेले आहे.

(३) मा. मंत्री, उच्च व तंत्र शिक्षण विभाग यांच्या अध्यक्षतेखाली राज्यातील ग्रंथालय संघाचे पदाधिकारी यांचे समवेत दि. १४/०७/२०१६ रोजी झालेल्या बैठकीत ग्रंथालयांच्या सेवकांना वेतनश्रेणी देणे शक्य नसल्याचे स्पष्ट करण्यात आले आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**मौलाना आझाद आर्थिक विकास महामंडळाच्या यवतमाळ येथील जिल्हा कार्यालयाबाबत.**

**(३६) ८९३३९ (२१-०८-२०१७). श्री.विकास कुंभारे (नागपूर मध्य) :** सन्माननीय **अल्पसंख्यांक विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अल्पसंख्याक समाजाला व्यवसाय, उद्योग स्थापन करण्यासाठी आर्थिक बळ देणारे मौलाना आझाद आर्थिक विकास महामंडळाचे यवतमाळ येथील जिल्हा कार्यालये फक्त नावापुरती सुरू असल्याचे माहे एप्रिल, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, ही कार्यालये केवळ प्रस्ताव स्विकारण्यापुरतीच असल्याने अल्पसंख्यकांची प्रचंड गैरसोय होत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त महामंडळाचे कार्यालय तातडीने कार्यान्वित करून अल्पसंख्यकांची होणारी गैरसोय दूर करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे (२१-०९-२०१७)** :(१), (२) व (३) हे खरे नाही. सद्य:स्थितीत यवतमाळ जिल्हयातील मौलाना आझाद आर्थिक विकास महामंडळ मर्यादीतच्या जिल्हा व्यवस्थापक पदाचा अतिरिक्त कार्यभार अमरावती जिल्हयाच्या सहाय्यक जिल्हा व्यवस्थापक यांच्याकडे सोपविण्यात आला आहे व त्या जिल्हयाची सर्व कामे सुरळीतपणे पार पाडण्यात येत आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**भंडारा जिल्हयातील बृहत आराखड्यानुसार मंजुरी दिलेली महाविद्यालये संस्थेने सुरु न केल्याबाबत**

**(३७) ८९५५१ (२१-०८-२०१७). श्री.रामचंद्र अवसरे (भंडारा) :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) भंडारा जिल्हयात बृहत आराखड्यानुसार शासनाने व राष्ट्रसंत तुकडोजी महाराज विद्यापीठ नागपूर यांनी महाविद्यालये सुरु करण्यास मंजुरी दिली, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त जिल्हयात महाविद्यालयासाठी मंजुरी घेतली असूनही महाविद्यालय सुरूच केले नसून संस्थांनी महाविद्यालय सुरु करण्यासाठी ठरवून दिलेले निकष पूर्ण केलेले नाहीत, पात्र कर्मचारी भरती तसेच बिंदुनामावली नुसार कर्मचारी भरतीचे निकष पूर्ण केलेले नाहीत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, शासनाने या बाबत चौकशी केली आहे काय व त्यानुसार मंजूर महाविद्यालय सुरु करण्याचे निकष पूर्ण न करणाऱ्या संस्थावर काय कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे (२२-०९-२०१७) :**(१) होय.
(२) अंशत: खरे आहे.
(३) भंडारा जिल्हयातील ३ महाविद्यालयांनी संलग्निकरणासाठी निश्चित केलेले निकष पुर्ण न केल्यामुळे या महाविद्यालाची शैक्षणिक वर्ष २०१७-१८ करीता प्रवेश प्रक्रिया गोठविण्यात आलेली आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**हरीभाऊ आदमने (ता.सावनेर, जि.नागपूर) महाविद्यालयाच्या चुकीमुळे ४२ विद्यार्थ्यांना परीक्षेपासून वंचित रहावे लागल्याबाबत**

**(३८) ८९७६५ (२१-०८-२०१७). श्री.सुधाकर कोहळे (नागपूर दक्षिण) :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) हरीभाऊ आदमने (ता.सावनेर, जि.नागपूर) महाविद्यालयाच्या चुकीमुळे ४२ विद्यार्थ्यांना परीक्षेपासून वंचित रहावे लागले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या प्रकरणाची चौकशी करुन संबंधित संस्थेवर कारवाई करण्याबाबत तसेच विद्यार्थ्यांचे झालेले नुकसानीबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे (०७-०९-२०१७) :**(१) हे अंशतः खरे आहे.
(२) विद्यापीठामार्फत चौकशी समिती नेमून संबंधितांवर कारवाई करण्याबाबत कार्यवाही करण्यात येत असल्याचे राष्ट्रसंत तुकडोजी महाराज, नागपूर विद्यापीठाने कळविले आहे. याबाबत विद्यापीठाद्वारे कार्यवाही करण्यात येत आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**सन २०१७-१८ या वर्षाकरीता ३६ नव्या महाविद्यालयांच्या प्रस्तावाबाबत**

**(३९) ९०११८ (२१-०८-२०१७). श्री.नसीम खान (चांदिवली) :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) कला, वाणिज्य आणि विज्ञान शाखांसाठी एकूण ४८ तुकडयांबाबतची मागणी तसेच सन २०१७-१८ या वर्षाकरीता ३६ नव्या महाविद्यालयांचे प्रस्ताव शालेय शिक्षण विभागाकडे आले असल्याचे माहे एप्रिल, २०१७ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, शासनाने महाविद्यालयांना तसेच तुकडयांना मान्यता देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे (२१-०९-२०१७) :**(१) व (२) अंशतः खरे आहे.

शैक्षणिक वर्ष २०१७-१८ साठी या कार्यासनाशी संबंधित पारंपारीक अभ्यासक्रमासंदर्भात नवीन महाविद्यालय / विद्याशाखा/अभ्यासक्रम यांच्या प्रस्तावांना मान्यता न देण्याचा निर्णय शासनाने दि.२१.१०.२०१६ च्या परिपत्रकान्वये व दि.९.११.२०१६ च्या शुद्धीपत्रकान्वये घेण्यात आला आहे. त्यानुसार शैक्षणिक वर्ष २०१७-१८ मध्ये विद्यापीठांनी नवीन महाविद्यालयाचे प्रस्ताव शासनास शिफारशीत केले नाहीत.

तथापि, राज्यातील अकृषी विद्यापीठाकडून उच्च शिक्षण संचालनालयामार्फत असलेल्या पारंपारिक अभ्यासक्रमाच्या अतिरिक्त तुकड्यांचे एकुण १६७ प्रस्ताव शासनास प्राप्त झाले असून त्यापैकी एकुण ११३ प्रस्तावांना दि.१९.८.२०१७ पर्यंत मान्यता देण्यात आलेली आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठातील २८ प्राध्यापकांवर साडेसहा कोटी खर्च केल्याबाबत**

**(४०) ९०६७६ (२१-०८-२०१७). श्री.अतुल सावे (औरंगाबाद पूर्व) :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठातील २८ प्राध्यापकांना एकत्रित वेतनावर नियुक्ती करून पाच वर्षांनी सर्वांना सेवा सातत्य देऊन विद्यापीठ निधीतून वेतनश्रेणी दिली, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, शासनाने २ वर्षापूर्वीच वेतनाचे दायित्व स्वीकारले आहे व २ वर्षापासून उक्त २८ प्राध्यापाकांचे वेतन करीत आहे, हेही खरे आहे काय,
(३) असल्यास, विद्यापीठ प्रशासनाने दोन वर्षापासून विद्यापीठ निधीतून उक्त प्राध्यापाकांच्या वेतनावर खर्च केला आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय व त्यानुसार सबंधितावर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे (२२-०९-२०१७) :** (१) हे अंशत: खरे आहे.
प्रश्न भागात नमूद विद्यापीठातील शिक्षकीय पदे विद्यापीठ अनुदान आयोगाने विहित केलेल्या वेतनश्रेणीवर नियुक्त करण्यात आलेले आहेत.
(२) (३) व (४) दि. २८.०१.२०१५ रोजीच्या शासन निर्णयान्वये डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठने विद्यापीठ निधीतून निर्माण केलेल्या ३० सहायक प्राध्यापक पदांच्या वेतनाचे दायित्व शासनाने स्वीकारलेले आहे. त्यापैकी प्रश्नात नमूद २८ कार्यरत पदांचे वेतन शासन अनुदानतून अदा करण्याची कार्यवाही विभागीय सहसंचालक, उच्च शिक्षण, औरंगाबाद व विद्यापीठ स्तरावर सुरू आहे. त्यामुळे सदरची कार्यवाही पूर्ण होईपर्यंत उक्त पदांचे वेतन विद्यापीठ निधीतून भागविण्यात येत आहे.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठास पुरस्कार मिळाला नसल्याबाबत**

**(४१) ९०८०४ (२१-०८-२०१७). श्री.अतुल सावे (औरंगाबाद पूर्व) :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ किंवा सलग्नीत महाविद्यालयास राज्य 'शासनाकडून देण्यात येणारा राष्ट्रीय सेवा योजना पुरस्कार या वर्षी जाहीर करण्यात आलेला नाही हे खरे आहे काय,
(२) तसेच, डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाच्या एन.एस.एस. विभागाकडून पुरस्कारासाठी प्रस्ताव पाठवले नाही हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुषंगाने सबंधित आधिकाऱ्यांवर कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत हे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे (२५-०९-२०१७) :**(१) सदर विद्यापीठाने शासनाकडे पुरस्कारासाठी प्रस्ताव पाठविलेला नाही. त्यामुळे त्या विद्यापीठाचा पुरस्कारासाठी विचार करण्यात आला नाही.

(२) होय, हे खरे आहे.
(३) प्रस्ताव पाठविणे ही बाब विद्यापीठाच्या कक्षे अंतर्गत असल्याने चौकशी करण्याचा प्रश्न उद्भवत नाही.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्यात अन्न आयोगाची स्थापना करण्याबाबत**

**(४२) ९०८१० (२१-०८-२०१७). श्री.सुनिल शिंदे (वरळी) :** सन्माननीय **अन्न व नागरी पुरवठा आणि ग्राहक संरक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यात अन्न सुरक्षा कायद्यानुसार 'अन्न आयोगाची' स्थापना करणे बंधनकारक असल्याने 'अन्न आयोगाची' स्थापना करण्यात आली आहे काय,
(२) असल्यास, राज्यात अन्न आयोगाची स्थापना केव्हा करण्यात आली आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश बापट (१३-०९-२०१७) :**(१) होय.
(२) दिनांक ११ एप्रिल, २०१७ च्या अधिसूचनेद्वारे राज्य अन्न आयोग गठीत करण्यात आला आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्यातील विशेषता मराठवाड्यातील महाविद्यालयात संगणकशास्त्र अभ्यासक्रम पात्र शिक्षकांविना शिकविले जात असल्याबाबत**

**(४३) ९१४२३ (२१-०८-२०१७). श्री.संदीपानराव भुमरे (पैठण) :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील १५४ महाविद्यालयात संगणक शास्त्र ,इलेक्ट्रोनिक्स व शारीरिक शिक्षण हे विषय विना अनुदानित तत्वावर शिकविले जात होते दिनांक ४ एप्रिल २०१२ रोजी शासनाने या विषयांना अनुदान घोषित करून वेतनासाठी ८ कोटी रु.ची तरतूद केली असूनही डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाशी संलग्न २३ महाविद्यालयात ४४ जागांवर गत ५ वर्षात एकही जागा भरली गेलेली नाही, हे खरे आहे काय,
(२) तसेच विना अनुदानित अभ्यासक्रमासाठी सरकारी अनुदान घेतल्यास नाममात्र दरात शिक्षण द्यावे लागत असून विना अनुदानित व्यावसायिक अभ्यासक्रमासाठी भरमसाठ शुल्क तसेच राज्य सरकार द्वारे मिळणारे इ.बी.सी.चे ५०% व मागासवर्गीयांचे पूर्ण शुल्क मिळते व नाममात्र १०/१५ हजारात अपात्र शिक्षक भरून भरपूर उत्पन्न मिळविता येते या मानसिकते मुळे संस्था चालक डिजिटल इंडिया धोरणाची अमलबजावणी करीत नसल्याचेही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, असल्यास त्यात काय आढळून आले, त्यानुसार दोषी संस्था व संस्था चालकांवर शासनाने कोणती कारवाई केली आहे वा करण्यात येत आहे व याबाबत कायम स्वरूपी काही निश्चित धोरण शासन राबविणार आहे काय,
(४) नसल्यास, विलंबाची काय कारणे आहेत ?

**श्री. विनोद तावडे (०७-०९-२०१७) :**(१) हे खरे नाही.
(२) प्रश्न उद्‌भवत नाही.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## अल्पसंख्याकबहुल ग्रामीण भागात मुलभूत व पायाभूत सुविधां करिता अनुदान वितरित करण्याच्या योजनेबाबत

**(४४) ९१४३२ (२१-०८-२०१७). श्री.संदीपानराव भुमरे (पैठण), श्री.अजय चौधरी (शिवडी), श्री.सुभाष उर्फ पंडितशेठ पाटील (अलिबाग), श्री.बाळासाहेब मुरकुटे (नेवासा) :** सन्माननीय **अल्पसंख्यांक विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) अल्पसंख्याकबहुल ग्रामीण भागात मुलभूत व पायाभूत सुविधा उपलब्ध करुन देण्यासाठी अनुदान वितरित करण्याच्या योजनेमध्ये अल्पसंख्यांक विभागाचे मंत्री यांनी मान्यता दिलेल्या कामा व्यतिरिक्त २६ कामांचा अनधिकृतपणे समावेश करण्यात आला आहे हे खरे आहे काय,
(२) असल्यास, शासनाने उक्त २६ कामांचा अनधिकृतपणे समावेश केल्याबाबत चौकशी केली आहे काय, असल्यास,त्यात काय आढळून आले व त्यानुसार उक्त कामांचा समावेश करणाऱ्या दोषी व्यक्तीवर शासनाने कोणती कारवाई केली आहे वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे (२६-०९-२०१७) :**(१) होय.
(२) अल्पसंख्यांक बहुल ग्रामीण भागात मुलभूत व पायाभूत सुविधा उपलब्ध करुन देण्यासाठी अनुदान वितरित करण्याच्या योजनेमध्ये सन २०१६-१७ या आर्थिक वर्षात दि.३१/०३/२०१७च्या शासन निर्णयामध्ये२६ कामांचा अनधिकृतपणे समावेश करण्यात आला होता. सदर बाब शासनाच्या निर्दशनास आल्याने तात्काळ कार्यवाही करुन दि.२९ एप्रिल,२०१७ च्या शासन निर्णयान्वये सदर २६ कामे रद्द करण्यात आलेली असून दि.०२ जून, २०१७ च्या शासन शुध्दीपत्रकान्वये रद्द केलेल्या कामांच्या ऐवजी नवीन कामांना मान्यता देण्यात आलेली आहे.
सदर योजनेत २६ अनधिकृत/मंजूरी प्राप्त नसलेल्या प्रकरणांचा अनधिकृतपणे समावेश झाल्या विषयीच्या प्रकरणाची प्राथमिक चौकशी सुरु आहे. सद्यस्थितीत या प्रकरणाशी संबंधित कक्ष अधिकारी यांना दि.२२/०६/२०१७ च्या शासन आदेशान्वये निलंबित करण्यात आलेले असून त्यांच्या विरुध्द म.ना.से. (शि.व.अ.) नियम १९७९ च्या कलम ८ अंतर्गत विभागीय चौकशी करण्याचे प्रस्तावित आहे.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**उत्तर महाराष्ट्र विद्यापीठांतर्गत जळगांव, धुळे, नंदुरबार जिल्ह्यातील महाविद्यालयातील कंत्राटी प्राध्यापकांना कायम सेवेत घेण्याबाबत**

**(४५) ९१६९४ (२१-०८-२०१७). श्री.चंद्रकांत सोनवणे (चोपडा) :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) उत्तर महाराष्ट्र विद्यापीठांतर्गत जळगांव, धुळे, नंदुरबार जिल्ह्यातील महाविद्यालयातील सुमारे ६०० कंत्राटी प्राध्यापकांना कायम सेवेत घेण्याचा प्रस्ताव शासनाकडे निर्णयासाठी प्रलंबित आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शासनाने सदर ६०० कंत्राटी प्राध्यापंकाना कायम सेवेत घेण्याबाबत कोणती निर्णयात्मक कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे (०४-०९-२०१७) :**(१) हे खरे नाही.

(२) प्रश्न उद्भवत नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**शासनाची राजर्षी शाहू महाराज शुल्क प्रतिपूर्ती योजना आर्थिक दृष्ट्या दुर्बल घटकातील विद्यार्थ्यांना लागू करण्याबाबत**

**(४६) ९२३०१ (२१-०८-२०१७). श्री.बाबुराव पाचर्णे (शिरुर) :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्य शासनाने दिनांक १३ ऑक्टोबर, २०१६ च्या शासननिर्णयाद्वारे राजश्री शाहू महाराज फि सवलती अंतर्गत आर्थिक मागास वर्गवारी साठी (ई.बी.सी.) कुटुंबाची वार्षीक उत्पन्न मर्यादा ६ लाख रूपये करण्यात आल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, ही योजना सन २०१६-१७ मध्ये अमलात आली असून ज्या विद्यार्थ्यांनी १२ वी मध्ये ६० टक्के पेक्षा जास्त गुण प्राप्त केले आहेत अशा विद्यार्थ्यांना तसेच उच्च शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांना या योजनेचा लाभ मिळणार आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, राज्य शासनाने उक्त योजनेचा लाभ विद्यार्थ्यांना सन २०१६-१७ मध्ये दिला नाही, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, असल्यास त्यानुसार कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कोरणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे (२५-०९-२०१७) :**(१) होय.

(२) नाही,

शासन निर्णय, उच्च व तंत्र शिक्षण विभाग,क्र.टीईएम-२०१६/प्र.क्र.५५९/तांशि-४ दिनांक ११/८/२०१७ अन्वये ६० टक्के गुणांची अट शिथिल करण्यात आली आहे.

(३) नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

### डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठात नियमबाह्य नियुक्ती दिल्याबाबत

**(४७) ९२५७९ (२१-०८-२०१७). श्री.अतुल सावे (औरंगाबाद पूर्व) :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठात महाराष्ट्र विद्यापीठ अधिनियम कायदा २०१६ व महाराष्ट्र विद्यापीठ अधिनियम १९९४ नुसार प्रभारी अधिकारी पद अस्तित्वात नसतानाही हे पद देण्यात आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या नियमबाह्य नियुक्तीमुळे विद्यापीठ कायद्याचे उल्लंघन झाले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय व त्यानुसार संबधितावर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची करणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे (२२-०९-२०१७) :**(१), (२) व (३) प्रश्न भाग १ मध्ये नमूद बाब खरी आहे. तथापि, महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम-२०१६ मध्ये पूर्वीच्या महाराष्ट्र विद्यापीठ अधिनियम १९९४ मधील संचालक, महाविद्यालय, व विद्यापीठ विकास मंडळ हे पद अस्तित्वात नाही. सदर पदाच्या अधिनस्त असलेल्या विभागातील प्रशासकीय कामकाजात सुसूत्रता आणि समन्वय साधण्यासाठी मा. कुलगुरू यांनी सदर विभागाचा कार्यभार पाहण्यासाठी प्रभारी अधिकाऱ्याचे पद तात्पुरत्या स्वरूपात भरलेले आहे.

शासन पत्र दिनांक २६.०४.२०१७ अन्वये कुलसचिव, अधिष्ठाता व इतर संवैधानिक अधिकारी यांच्या नियमित नियुक्तीबाबत निकडीच्या परिस्थितीत सदर प्रकरणी महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम-२०१६ मधील कलम १२ (७), कलम १०५ व कलम १४३ नुसार संवैधानिक अधिकाऱ्यांची पदे अतिरिक्त कार्यभार देऊन तात्पुरत्या स्वरूपात भरण्याबाबत अकृषि विद्यापीठांना कळविण्यात आलेले आहे. त्यामुळे कायद्याचे उल्लंघन झाले असे म्हणता येणार नाही. सबब चौकशी करून कारवाई करण्याचा प्रश्न उद्भवत नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

### राज्यात मराठी भाषा धोरणाची अंमलबजावणी करणेबाबत

**(४८) ९२७९१ (२१-०८-२०१७). श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व) :** सन्माननीय **मराठी भाषा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) भाषा सल्लागार समितीने मराठी भाषा धोरणाचा मसुदा दिनांक ३० जून, २०१७ रोजी वा त्यासुमारास राज्य शासनाकडे सादर करण्यात आल्याचे निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मराठी भाषा धोरणाच्या मसुद्याप्रमाणे राज्यामध्ये भाषा धोरणाची अंमलबजावणी केव्हापासून करण्यात येणार आहे,
(३) तसेच, ५ परिभाषा कोषाचे अद्ययावत व सुधारित आवृत्त्या बनविण्याचे काम गत अनेक दिवसांपासून प्रलंबित आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, शासनाने प्रश्नोक्त भाग १ व २ बाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे (१४-०९-२०१७) :**(१) व (२) भाषा सल्लागार समितीने मराठी भाषा धोरणाचा मसुदा दि.३० जून, २०१७ रोजी शासनास सादर केला असून सदर मसुद्याच्या अनुषंगाने धोरणात्मक निर्णय घेण्याच्या दृष्टीने पुढील कार्यवाही सुरू आहे.
(३) परिभाषा कोशांचे अद्ययावतीकरण व नवीन परिभाषा कोश तयार करणे ही सातत्याने करावयाची प्रक्रिया असून विभागाने आतापर्यंत ३७ परिभाषा कोश / शब्दावल्या यांची निर्मिती केली आहे. तसेच १० नवीन परिभाषा कोशांचे काम हाती घेतले आहे.
(४) वरील (१) व (२) प्रमाणे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**मुंबईतील सर जे.जे. स्कूल ऑफ आर्टसह राज्यातील खासगी महाविद्यालयात 'बीएफए' या अभ्यासक्रमाला अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषदेची मान्यता नसल्याबाबत**

**(४९) ९२९६१ (२१-०८-२०१७). ॲड.भीमराव धोंडे (आष्टी), श्री.सुनिल शिंदे (वरळी) :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मुंबईतील सर जे. जे. स्कूल ऑफ आर्ट, शासकीय चित्रकला महाविद्यालय तसेच नागपूर व औरंगाबाद या शासकीय महाविद्यालयांसह राज्यातील ९० हून अधिक खासगी महाविद्यालयात गत १० वर्षापासून सुरु असलेल्या 'बीएफए' या अभ्यासक्रमाला अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषदेची (एआयसीटीई) मान्यता नसल्याची बाब माहे जून, २०१७ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय;
(२) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे आहे काय, असल्यास, चौकशीत काय निष्पन्न झाले व त्यानुसार शासनाने कला संचालनालयाच्या नियंत्रणात असलेल्या शासकीय व खासगी महाविद्यालयांत सुरु असलेल्या सदरहू अभ्यासक्रमाला एआयसीटीईची मान्यता मिळण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहेत,
(३) असल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे (२२-०९-२०१७) :**(१) अंशत: खरे आहे.
(२) व (३) वरील तिन्ही कला महाविद्यालयांना AICTE ची मान्यता मिळविण्याकरीता शासनाच्या, संचालनालयाच्या तसेच महाविद्यालयाच्या स्तरावर पाठपुरावा करण्यात येत आहे.

खाजगी पदवी कला महाविद्यालयांच्या बाबतीत सदर अभ्यासक्रम सुरु करण्यास अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषदेची मान्यता प्राप्त झाल्यानंतर संबंधित संस्थेने सदर अभ्यासक्रम सुरु करण्यास शासनाची मंजूरी मिळाल्याचे आदेश निर्गमित झाल्यानंतर संबंधित विद्यापीठांकडे संलग्नतेसाठी प्रस्ताव सादर करणे अपेक्षित असल्याचे सर्व अकृषी विद्यापीठांना शासनपत्र दि. २८.०६.२०१७ अन्वये कळविण्यात आले आहे.

---

**औरंगाबाद विद्यापीठ प्रशासनाने अनेक वर्षापासून एकाच ठिकाणी कार्यरत असलेल्या कर्मचाऱ्यांच्या करण्यात आलेल्या बदल्याबाबत**

**(५०) ९३५९२ (२१-०८-२०१७). श्री.प्रशांत बंब (गंगापूर) :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) औरंगाबाद येथील एका अभियांत्रिकी महाविद्यालयात परीक्षा काळात घडलेल्या मासकॉपी प्रकरणानंतर विद्यापीठ प्रशासनाने अनेक वर्षापासून एकाच ठिकाणी कार्यरत असलेल्या ९६ कर्मचाऱ्यांच्या तडकाफडकी बदल्या केल्याची बाब दिनांक ३ जून, २०१७ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, कायमस्वरुपी कर्मचाऱ्यांबरोबरच विद्यापीठात कंत्राटी कर्मचाऱ्यांचा देखील भरणा असून हे कंत्राटी कर्मचारीसुद्धा अनेक वर्षापासून एकाच ठिकाणी कार्यरत आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, कंत्राटी कर्मचारी विद्यापीठाच्या जनसंपर्क तसेच गोपनीय विभागात कार्यरत आहेत विद्यापीठ प्रशासन त्यांच्या बदल्या करणार काय,

(४) असल्यास,याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय व त्यानुसार कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे (२२-०९-२०१७) :**(१) होय हे खरे आहे.

(२) होय, हे खरे आहे.

(३) व (४) विद्यापीठातील कंत्राटी कर्मचाऱ्यांच्या देखील बदल्या करण्याची कार्यवाही विद्यापीठाकडून सुरू आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**विधान भवन :** | **डॉ. अनंत कळसे**
**नागपूर.** | **प्रधान सचिव,**
**महाराष्ट्र विधानसभा.**

---

शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, नागपूर.